
Impact Factor – 7.675 ISSN-2278-9308



# B.Aadhar

***Multidisciplinary International Research Journal***

**PEER REFEREED & INDEXED JOURNAL**

January -2020

**SPECIAL ISSUE - CCIV**

## Role of Civil Service and Hospitality Education in Employability

**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social**
**Research & Development**
**Training Institute Amravati**

**Editor:**
**Dr.Anil B. Bhagat**
**Ramkrushna Mahavidyalaya Darapur**
**Dist. Amravati.**

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
Global Impact Factor (GIF)
Universal Impact Factor (UIF)
International Impact Factor Services (IIFS)

ISSN – 2278-9308

Impact Factor – 7.675

# B.Aadhar

## Multidisciplinary International Research Journal

Peer-Reviewed Indexed

January - 2020

SPECIAL ISSUE - CCIV

# Role of Civil Service and Hospitality Education in Employability

Chief Editor :
Dr. Virag.S.Gawande

Editor :
Dr.Anil B. Bhagat
Ramkrushna Mahavidyalaya Darapur
Dist. Amravati.

Aadhar International Publications
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 225/-

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Special Issue
ISSN : 2278-9308 January 2020

# लीळाचरित्रकालीन ग्रामव्यवस्था

प्रा.डॉ. ममता इंगोले
सहयोगी प्राध्यापक तथा प्रमुख,पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, डॉ.एच. एन. सिन्हा महाविद्यालय, पातुर.जि. अकोला.

'ग्रामव्यवस्था' हा भारतीय राज्यव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहे. भारतीय ग्रामव्यवस्था म्हणजे लहान लहान लोकसत्ताक राज्येच होत. आज आधुनिकतेच्या वा-यात ग्रामजीवन हरवून गेले आहे. पूर्वी स्वच्छ, सुंदर व निसर्गाशी निगडित अशी आदर्श ग्राम अस्तित्वात होते. प्रत्येक गाव आपल्यापुरते स्वतंत्र असल्यामुळे गावातील लोकांचा व्यवहार सुखाने चालत होता. स्वावलंबन व स्वयंपूर्णत: ही गावजीवनाची वैशिष्ट्ये होती.

'गाव' ही संकल्पना निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे शेती होय. मानवाच्या प्राथमिक अवस्थेत त्याची एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी सतत भटकंती सुरू होती. पुढे शेतीचा शोध लागला व त्याची भटकंती संपली. शेतीकरिता त्याला पाण्याची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे त्याने नदीकाठी वस्ती केली. याच वस्तीचे पुढे 'गाव' असे नामाभिधान झाले. त्रि. ना. आत्रे यांच्या मते, ''जिच्यासभोंवती कीर्दसार - वाहितीला योग्य - जमीन आहे आणि जिच्यामध्ये मात्तबर शेतकरी व पुष्कळसे मजूर आहेत, अशा वस्तीला 'गाव' म्हणतात. गावच्या हद्दीला 'शींव' ही संज्ञा आहे. गावाचे स्वभावत: आणिएकमेकांपासून अलग असे दोन भाग उघड उघड पडतात. एक पांढरी किंवा गावठाण आणि काळी किंवा रान.''[1] हे शब्द अनेक, कथा, कविता, कांदबरीतून आजही आढळतात. मेल्यावर आपली हाडे पांढरीतच पडली पाहिजेत अशी पांढरीविषयीची ओढ आजही ग्रामस्थांमध्ये दिसून येते. डॉ. सुधा काळदाते यांनीही गावाचे सर्वांगीण स्वरुप स्पष्ट करणारी व्याख्या केली आहे. ''ज्या समुदायाच्या उपजीविकेचा साधन प्रामुख्याने शेती व शेतीला पूरक उद्योग हे आहे, ज्या समुदायाला स्वत:ची अशी वस्ती व जागा आहे व ज्या समुदायातील व्यक्तींचे आर्थिक, राजकीय व सामाजिक जीवन त्या वस्तीतच जगले जाते अशा समुदायाला गाव असे म्हणतात.''[2] या व्याख्येतून आलेला 'समुदाय' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. ग्रामव्यवस्थेत व्यक्तीपेक्षा समुदायाला प्राधान्य दिलेले असते. येथे प्रत्येक गोष्टीतच सामुदायिकता येते. रीतिरिवाज, सण, उत्सव, न्यायनिवाडा, उद्योगधंदे इत्यादी. गावात प्रत्येक जण परस्परांवर अवलंबून असतो. त्यामुळे परस्पर सहकार्य व सामंजस्याची भावना वाढीस लागलेली दिसून येते. त्यातूनच गावाला सुरक्षितता लाभते. याबद्दल डॉ. विठ्ठल वाघ म्हणतात, ''प्रत्येकाचे व्यक्तित्व लोपून तो ग्रामनिष्ठ होऊन जातो. 'समुदाय संवेदना' महत्त्वाची. ते ग्रामजीवनाचे प्रमुख वैशिष्ट्य. ग्रामजीवन स्वयंपूर्ण, आपल्या गरजा आपणच भागविणारे असते. ग्रामीण समाजाचे स्वायत्त, स्वयंपूर्ण, आर्थिक व्यवस्था शतकानुशतके अबाधीत राहिले.''[3] सर्व धंदेवाईक समुदायाचे काम इतर जातींच्या धंद्यांतील लोकांच्या कामाशी संबद्ध असे. आपआपल्या क्षेत्रात प्रत्येक जातीने नीट कार्य केले तर सर्व समाज सुखी राहील अशी समजूत होती. कुंभार मडकी घडवितो, सा-या गावकीला पुरवितो, मातीच्या भाड्याशिवाय गावाचे अडते. गावाशिवाय कंभाराचे नडते, अशी ही परस्परावलंबी अवस्था असते. एकट्यादुकट्याच्या जगण्याला येथे अर्थ नसतो. सामूहिक असे जगणे असते. गावातील एखाद्या व्यक्तीवर संकट आले तर गावावरचे संकट समजल्या जाते. प्रत्येकाच्या जीवनाची सुरक्षितता, सुबत्ता, सुख - द:ख, अडीअडचणी गावाच्या जीवनाशी एकरूप ला असते. गावात राहणाऱ्या व्यक्तीला गावचे नीती, नियम, संकेत, रुढी, पंरपरांचे पालन करावे लागते. त्यात जर चूक झाली तर गाव देईल त्या न्यायाला सामोरे जावे लागते. ग्रामसंस्थेला स्वायत्त व स्वयंपूर्ण स्वरुप प्राप्त होऊन ते अभेद्य कसे राहील याचे जर उत्तर शोधायचे झालेच तर त्यासाठी समाजव्यवस्थेच्या रचनेचा विचार करता लागतो.

पांढरीवर वस्ती करून राहणारे जे लोक होते त्यांच्या व्यवसायावरून अथवा उद्योगपरत्वे दोन विभाग झालेत. पहिला कुणबी म्हणजे शेतकरी व दुसरा अडाणी म्हणजे बिगरशेतकरी. ग्रामव्यवस्थेत केंद्रस्थानी जो उद्योग आहे तो शेतीचा, परंतु शेतीला पूरक असे विविध व्यवसाय करणारा फार मोठा वर्ग खेड्यात असतो. लोहार,

चांभार, सुतार, मांग, महार इत्यादी सर्वांचा समावेश होतो. सुताराने घडविलेल्या तिफणीला पास हवी असते ती लोहार घडवितो, तिफण हाकणारे बैल जरी शेतक-याचे असतील तरी बैलाला बांधलेले कासरे मांग बनवितो. प्रत्येकाच्या उद्योग, व्यवसायावरून त्याची जात ठरत असते. दुर्गा भागवतांच्या मते, ''जातिसंस्थेचे व्यावसायिक स्वरूप हे आनुवांशिक उद्योगधंद्याच्या स्वरुपाचे जगातील सुधारलेल्या राष्ट्रात असायचे तसेच बहतांशी आहे. उद्योगधंद्याचे आनुवांशिक वर्गीकरण भारतातल्याप्रमाणे जातिसंस्था आणि बलुतेदारीचा उगम झालेले असावे.''[४] त्रि. ना. अत्रे यांनी बलुतेदार व अलुतेदारांची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. '' कुणब्याने गांव वसविले आणि काळी उचलली खरी तथापि त्याचा धंदा पार पाडण्याला व प्रपंचाची अनेक काम चालण्याला अडाण्यांच्या जातीपरत्वे धंद्याची गरज होती म्हणून कुणब्याने आपल्याबरोबर अडाणी आणिले. त्यात पहिल्याने 'कारु' व नंतर 'नारु' आले. 'कारु' हा शब्द 'कार' (करणारा) या शब्दापासून निघाला आहे. ज्याची विद्या, कसब किंवा मेहनत कुणबिकीला अथवा कुणब्याच्या सरकारी खासगी व्यवहाराला अवश्य असा धंदा करणारा तो 'कारु' आणि ज्याच्या धंद्यावांचून कुणब्याचें नडत नाही किंवा क्वचित नडते, असा धंदा करणारा तो 'नारु.' 'कारु'ला 'बलुतेदार' किंवा 'बलुत्या' आणि 'नारु'ला 'अलुतेदार' किंवा 'आलुत्या' असे म्हणतात.''[५] गावक-यांच्या गरजा भागविण्यासाठी 'कारु' 'नारु' आपापल्या कसबानुसार कामे करतात त्याचा मेहनताना म्हणून कुणब्यांकडून जो पिकाचा वांटा वंशपरंपरेने मिळतो, त्याला अनुक्रमे 'बलुते' आणि 'आलुते' म्हणतात. ''कुणब्यांना ज्या बलुतदारांचा जितका उपयोग त्या मानाने त्यांची प्रतवबंदी लागून त्यांची तीन वर्ग झाले आहेत अशा वर्गाला ओळ किंवा कांस म्हणतात. कांस म्हणण्याचा प्रघात पडण्याचे कारण असे की, कुणबी ही गाय व बलुतेदार ही वासरे मानली आहेत आणि ही वासरे आपापल्या पाळीप्रमाणे कांसेला लागलेली आहेत. चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी, यांना बारा 'कारु' किंवा 'बलुतेदार' म्हणतात तर तेली, तांबोळी, साळी, धनकर, शिंपी, माळी, गोंधळी, डौ-या, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाना, वाजंत्री, घडसी, कलावंत, तराळ किंवा कोरबु, भोई वगैरेंना अठरा 'नारु' किंवा 'अलुतेदार' म्हणतात.''[६] बहुतेक सर्वच ग्रामीण अभ्यासकांनी ग्रामीण समाजव्यवस्थेचा आधार म्हणून 'बलुतेदारी' आणि 'अलुतेदारी' मान्य केली आहे. त्याचे अस्तित्व गावाच्या आकारमानावरुनही ठरते.

वरीलप्रमाणे विविधांगी व स्वयंपूर्ण अशीग्रामव्यवस्था लीळाचरित्रकाळात होती, लीळाचरित्रात ग्रामव्यवस्थेचे परिपूर्ण चित्रण आले आहे. लीळाचरित्राचे नायक श्री चक्रधरस्वामी यांचे परिभ्रमण संपूर्ण महाराष्ट्रात होते. ''स्वामी आर्ताते वाडोवाडी गिवसती'' यानुसार खेड्यापाड्यांपासून ते मोठमोठ्या नगरांपर्यंत स्वामींचा संचार होता. त्यामुळेच तत्कालीन ग्रामव्यवस्थेचेदेखील अतिशय समर्पक असे वर्णन आले आहे. याच ग्रामव्यवस्थेचा आढावा या ठिकाणी प्रस्तुत निबंधात लेखकाने घेतलेला आहे.

लीळाचरित्रकालीन महाराष्ट्रात लहान - मोठ्या गावांतून राहणा-या लोकांचा प्रमुख उद्योग शेती होता. तत्कालीन खेडी ही बहुधा स्वयंपूर्णच होती. ही खेडी फलटण, ऋध्दिपूर, पैठण, कटक, देवगिरी, नाशिक, लोणार, मेहकर यांसारख्या मोठ्या नगरांच्या आश्रयाने वसली होती. खेडयांमध्ये प्रामुख्याने शेती हाच प्रमुख व्यवसाय असला तरी शेतीला तसेच ग्रामव्यवस्थेला पूरक असे लहान मोठे व्यवसाय होते. व्यापारी धान्य, कापड, सुगंधी द्रव्ये, कापूर, रत्नेमाणिके, बैल, घोडे आदी मालांची खरेदी-विक्री करीत. 'चाटा' (उ.९), 'दुसी' (पू. २८), 'हेडाऊ', (पू.३१), 'गंधी' (पू. २८), 'सुंकीये' (पू. ३००) आदींचे महत्त्व ग्रामव्यवस्थेत होते. 'अधार' किंवा 'ब्रह्मपुरी' म्हणजेच ब्राह्मणांना विद्याभ्यासाकरिता दान दिलेली गावे होती. कित्येक गावांतून अन्नछत्र चालत होते. देईगाव येथे नाथो कोरो आणि कान्हो कोरो या भावंडांनी अन्नछत्र चालविले होते. (उ. ९९) लीळाचरित्रकालीन गावाची रचना अतिशय सुनियोजित होती. गावाला 'चतुर्सीव' (पू.५०९) होत्या. त्यामुळे गाऊ' (पू.२००, गाव) चे चारही बाजूंनी संरक्षण होत होते. काही गावे 'धुळिकोट' (अ.१. मातीने बांधलेले) किल्ल्यांमध्ये वसली होती. गावाभोवती 'वेस' (पू.८०) किंवा 'खांडी' (पृ.१०६) होत्या. सूर्यास्त झाल्यावर 'वेसी पडत.' (पू□.८५) सूर्योदय झाल्याशिवाय हे दरवाजे कुणासाठीही उघडल्या जात नव्हते. (पू.८१), मोठ्या वेशींच्या दरवाजांना लहान 'आडे' (उ.३६७, लहान दरवाजे) होते. गावाच्या शिवेवर गावाच्या ओळखीसाठीची खूण म्हणून 'गुढा' (पू.५८९) किंवा

'लाणी (अ.४७) पुरत होते. शिवेजवळ 'कळीसर' उ.५४ रिकामी जागा) ठेवलेल्या होत्या. गावाच्या शिवेबाहेर 'आखर' (पू.१९१, गोठाण), 'राखीएचे रान' (पू.८६,) गुरांना चारण्यासाठी राखून ठेवलेले होते.

लीळाचरित्रात 'गव्हाण' (१.१५. कमी लोकसंख्येचे गाव), 'हाळी' (उ.५९५, पाच ते दहा घरांच्या वस्तीचे गाव) चा उल्लेख आला आहे. श्रीचक्रधरस्वामी अखंड भ्रमण करीत. या भ्रमणकाळात स्वामींचा निवास अथवा मुक्काम या हाळियापाळीया'तच होता.(उ.४४८) घरांच्या जातीनिहाय वस्त्या होत्या. त्यात 'ब्रह्मपुरी( पू. ११०, ब्राह्मणाची वस्ती), 'वसुवार'(उ.३६९, बहुजन समाजाची वस्ती), ते किंव्हा 'पाळी' (उ.५९५, पाले उभारून राहणा-या भटक्या लोकांची वस्ती), 'दुसे'(पू.३१, कापडी तंबू, फिरत्या व्यापार-यांची वस्ती), 'हाटघर' (पू. ४३२ बाजार ओळीतील व्यावसायिकांची वस्ती),'गुंफा' (पू.४४, संन्याशांची वस्ती), इत्यादींचा समावेश होता. 'महारवाडा' (पू. १११) हा गावच्या शेवटी होता. गावात सर्व जातीजमातींचे लोक गुण्यागोविंदाने नांदत होते, गावाच्या प्रवेशद्वाराजवळ वा मध्यभागी वड व पिंपळाची, झाडांभोवतीच्या दगडमातीच्या 'पारा' (पू. ३३)वर गावातील ग्रामस्थ शिळोप्याच्या गप्पांसाठी एकत्र येत होते. 'पार' हा या ग्रामव्यवस्थेतील एक भाग होता. भ्रमंतीमध्येच श्रीचक्रधरस्वामी 'डाकराम' येथे मुक्कामी थांबले. जेवन करून ते आरामासाठी देवळात जात असताना ''तवं गांविचे लोक पारीं बैसले होते: तेही म्हणीतलें : 'देव हो : या देउळां नको जाओं: एथु वाघु एत असे :'' (पू.३३)

लीळाचरित्रकालीन ग्रामव्यवस्थेत गावांतील मुलांच्या शिकण्याचीही व्यवस्था असलेली दिसून येते. गावांमधून ब्राह्मणांनी चालविलेल्या पाठशाळा होत्या. या पाठशाळांमधून अनेक विद्यार्थी विद्यार्जन करीत होते. विद्याभ्यास करणा-या 'भामाठाणा' येथील चंद्रदेवाचा उल्लेख आला आहे. (उ. २००) तत्कालीन काळातील शाळांना सुट्यादेखील होत्या. त्याला 'अनाध्य' चा दिवस म्हणत. चंद्रदेव हे 'अनाध्या'च्या दिवशी स्वामींना भेटण्यासाठी आले होते. (उ. २००) याचाच अर्थ असा की विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था पाठशाळांमध्येच केली जात होती. या शाळा मंदिराच्या 'पटिसाळे' तसुद्धा भरत होत्या. गावामधील 'चाटा' (पू. १५, विद्यार्थी) विद्यार्जनासाठी 'साळेत' (पू. १२८) जात होते व उपाध्ये' (पू. १५) त्यांना ज्ञानदान करीत होते.

ग्रामव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान असते ते 'सांते'ला (पू. ३८७, बाजार) किंवा 'सामान' (पू. ९२) अथवा 'हाटाला' (पू. ९९) या बाजारांची 'हाटवेळ' (पू. ९९, निश्चित दिवस वा वेळ) ठरलेली होती. बाजारात 'हाटवटी' (पू. १२,गोंधळ उडू नये म्हणून दुकानांचे निश्चित केलेले स्थान.) होत्या. या बाजारात अनेक प्रकारच्या 'हाटकेवा' (उ. ५४६, विक्रीच्या वस्तू), 'हाटवका' (पू.१४४, बाजारातील चीजवस्तू) 'हाटवेच' (उ.२४४. सामानसुमान) व 'वेसजु' (पृ.२०१, अन्नसामग्री) यांचा खरेदी - विक्री व्यवहार होत होता. बाजारात लोक 'वेसरु' (पु.१४४, मीठ - मिरची) ची खरेदी करण्यासाठी जात होते. 'बाजारात रांधवनहाट' (पु.२०, हलवायांच्या दुकाना पेठ) ही होती. या हाटात निरनिराळ्या प्रकारचे 'खाजे' (पू.३९,खाऊ) विक्रीस ठेवलेला असे. तसेच मांसाहारी लोकांचाही विचार तत्कालीन समाजजीवनात केलेला दिसतो. बाजारात 'मासदवाडा' (प. २०२ मांस, मासे विकण्याची पेठ) होता. तत्कालीन ग्रामजीवनात गावातील बाजारात दैनंदिन गरजा भागविणाच्या विविध वस्तू, भाजी वस्त्रप्रावरण्, धान्य, भांडी, किराणा, सोने-चांदी मिळत होती, त्यामुळे गावात भरणारा बाजार गावक-यांच्या गरजा भागविण्यास पुरेसा ठरत होता. जास्त मोठ्या प्रमाणात सामान वा मौल्यवान जडजवाहीर खरेदी करण्यासाठी मात्र नगरांच्या बाजारपेठेत जावे लागत होते. गावामध्ये 'चौहट' (अ. १५, चार रस्ते जोडणारी जागा), 'बेंझा (उ. २७५, दोन रस्ते फुटतात अशा )'दुबळके' आणि 'बिट्टी' (पू. ३. रस्ते) होत्या.

पावसाचे पाणी वाहून जाऊ नये, ते अडवून गावातील ग्रामस्थांना, गुरेढोरे, शेती व इतर व्यवसायांसाठी लागणारे पाणी भरपूर प्रमाणात उपलब्ध व्हावे, याचा विचार लीळाचरित्रकालीन ग्रामप्रमुखाने केलेला असावाय जीवनदायी पाण्याचे महत्त्व त्यांना कळले असावे गावात जलसाठा विस्तृत प्रमाणात राहावा म्हणून पाणी साठविण्याकडे त्यांचा कल दिसून येतो. गावाबाहेर 'जळमांडवी' (पू. ७५), 'पोखरणी' (पू.१७५), तळोली' (पू. ३८), 'सरवरु' (पू.२६१, पाणी साठविण्याचे 'तळे') अथवा 'पुष्करण्या होत्या. 'जळमांडवी चा उपयोग जलक्रीडेसाठीही केल्या जात होता. तळ्यांना 'पाळ' (पू. २९, बांधलेले काठ) होते. ओरंगळ प्रदेशात स्वामींचे एका ठिकाणी अवस्थान असताना 'पाणिपात्र भिक्षा मागून, ''तळां आरोगण केली : पाळी पींपळ : तेथ आसन

जाते'' (पृ. २९) असा उल्लेख आढळतो. काही गावांमध्ये 'कुंड' (पृ.६१. पाण्याचे टाके) होते. त्याचाही उपयोग पाणी साठवणासाठी केला जात होता. गावातही ग्रामस्थांसाठी पाण्याची उत्कृष्ट व्यवस्था केलेली आढळते. घरासमोर किंवा आळीच्या मध्यवर्ती ठिकाणी 'बावी' (उ. ४४४, विहिरी), 'अड' (पृ. १६२), 'वावी' (पु. १७५), 'कुहा' (उ.४४८), 'बोडी' (उ.२०८) होत्या. काही 'नीसरबोडी' (पृ.४७१, शेवाळलेली विहीर) होत्या. कुठेकुठे 'बोंडणवावी' (उ.३२१. चारही बाजूंनी पाय-या असलेली व दगडी चिन्यांनी बांधून काढलेली पायविहीर) होत्या. तत्कालीन ग्रामव्यवस्थेत पाणी अडवा, पाणी जिरवाय गाव समृद्ध बनवा' हा मंत्र जपलेला दिसतो.

कृषिप्रधान ग्रामाला पशुधनाची गरज असते, त्यामुळे पशुधनाकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे, याची जाणीव तत्कालीन ग्रामप्रमुख व ग्रामस्थांना होती. कारण पशू व गुरेढोरे यांची उत्कृष्ट व्यवस्था ते ठेवीत होते. असे अनेक लीळांचा अभ्यास केल्यास दृष्टिपथास येते. घोड्यांकरिता 'ठाणे' (उ.५१३), गुराढोरांना बांधण्याकरिता 'कलवड' (उ.३३, तुरखाट्यांचा गोलाकार उभा कोठा), 'कोठा' (पु. ४५३) 'पडाळ' (पृ.४९०) होता. गावात गुरांना बसण्यासाठी 'गोठण' (पृ.५३, मोकळी राखीव जागा) होते. गुरांना चराईसाठी 'वाठाण' (उ.३६१, गावाच्या चारही बाजूंनी असलेली मोकळी राखीव जागा), 'आखर' (पृ.१९१), 'राखीचे' रान (पृ.१९७) होते.

गावात विविध प्रकारांची घरे होती. लीळाचरित्रकालीन घरांवरून त्या घरात राहणाऱ्या व्यक्तींच्या आर्थिक, सामाजिक स्थितीची कल्पना येते. 'दीघडीया' (पृ. २०, उंचावरील मोठी व प्रशस्त घरे) मध्ये गावातील श्रीमंत व प्रतिष्ठित लोक राहत होते. घरांना 'उपरी' (पृ. १८, माड्या) होत्या. या माडीवर चढण्यासाठी 'दादरा' (उ.३०२) होता. सुरक्षिततेसाठी 'बाळाने' (पृ. ३९, कठडा अथवा सज्जा) होता. घरांची छते 'पाटणी' अथवा 'माळवधा'( पृ.२०)ची होती. प्रतिष्ठितांच्या घरांना 'रिगावा'( पृ. १८७, मोठे लाकडी दरवाजे) होत्या. तसेच सिंहाडा' (उ. ५६१ तसेच सिंहाकृती ओटा), 'सोंड' ही (पृ.४०, सोंडेच्या आकाराचा ओटा) होत्या. काही घरांना 'दाराठी' (पृ. ९४, लहान दारवंठा) होत्या. दरवाजांना 'कवाडे' (पृ. १३१), कवाडे लावल्यानंतर ती उघडू नयेत म्हणून 'आगळ' (पृ. ९३, लाकडी दांडा) किंवा 'भूआगळ' (अ. ६६) लावलेल्या होत्या. घराच्या सुरक्षिततेसाठी खिळी' (पु. ५७), 'कुंचीटाळे' (पृ.८०), 'तळे' (पृ. ८०, कुलूप) लावत होते. यावरून घराच्या सुरक्षिततेविषयी किती काळजी घेतल्या जात होती, हे दिसून येते. मध्यमवर्गीय व थोडीफार बरी परिस्थिती असलेले लोक 'माळवध' (उ, १६३) 'घाबे' (पृ. ४८७. मातीचे पेंड लावलेले) असलेल्या घरात राहत होते. गरीब लोक मात्र पाड्यात' (उ.२८२, कापडी पाल), 'प्राणकुटी' (पृ. २३) अथवा पालीवनातं' (उ. ४४८, पाल्याचे छप्पर असलेली झोपडी) राहत होते. गावात आलेले भटक्या जातीचे लोक 'दुसे' (पृ. ३१, कापडी तंबू) त राहत होते.

घरात उजेड यावा, हवा खेळती राहावी म्हणून घरांना 'जाळारख' (पृ.२९, जाळीची खिडकी) होत्या. काही घरांना 'वावणे' (उ.१३०, प्रकाश यावा म्हणून घराच्या धाब्याला केलेले मोठे वर्तुळाकार छिद्र) होते. प्रत्येक मोठ्या घरातल 'भानवस' (पृ. ४२४, स्वयंपाकघर), रांधवनघर' (पृ. २८) होते. तिथरी' (पृ.५८२, तीन थरांच्या चुली), 'सगडी' (पृ. ४३९) वर स्त्रिया अन्न रांधीत.' (पृ.२८) काही मोठ्या घरांमध्ये 'रांधवणी' (पृ. २८, स्वयंपाकीन) तसेच 'भोजनता' (पृ.५१४) होत्या. घरात 'माझघर' (पृ.२८)तर 'खवग' (अ. ४४. अडचणीची जागा) होती. तिथे 'उगाना' (पृ.१७, सामान) ठेवीत. 'खणा'त (उ, ६७, घरातील भाग) 'उतरंडी (उ.४९४) होत्या. उतरंडीतील मडक्यांमध्ये दाळदाना भरून ठेवत होते. आजही गावागावांत घरांतून मडक्यांच्या उतरंडी दिसतात. 'कोथळ्या' (पृ.२५५, कणग्यात) तून धनधान्य भरून ठेवीत होते. दळणकांडण करण्यासाठी 'उखळी' (पृ.१६६) होत्या. अनेक घराना 'वळणी' (पृ.३६), 'पटिसाळ' (पृ. ४८,ओसरी) किंवा 'पाटसरा' (उ. ७०) होत्या. अनेक लीळांमधून 'गोसावीयांसि पाटसरेयावरि आसन असे :'(उ.७०) असे उल्लेख श्रीचक्रधरस्वामींबद्दल आलेले आहेत.

लीळाचरित्रकालीन लोकजीवनात घरात पाणी साठविण्याकरिता माती, तांबे, पितळेची भांडे, चामड्यांच्या पिशव्या, पन्हाळ वगैरेंचा वापर केल्या जात होता. मातीच्या भांडयांमध्ये 'अंळदी' (पृ.९, मोठ्या तोंडाचे भांडे), 'करवती' (उ.१४६), 'करा' (पृ.४०८), 'खागरि' (पृ.१८४), 'घडी' (उ.१३३), 'घागरि' (पृ.९६), 'वानरी('उ.१५, लहान भांडे), 'माधान' (पृ.२५०, मोठे मडके अथवा रांजन) यांचा समावेश होतो. मातीच्या भांडयांशिवाय तांब्यांची भांडेही वापरात होतीय यात 'तांबकळसा'(पृ,१९८,घागर), 'तांबवटी (पृ.१०५, लहान

भांडे), 'केळी' (१,४९३) यांचा समावेश होतो. प्रवासात पाणी थंड राहण्यासाठी 'सागळ' (पू.२६, कापडी पिशव्या) वापरत होते. काही ठिकाणी चामड्याच्या पिशव्यासुद्धा उपयोगात आणल्या जातय त्यात 'खुळिगा' (पू. ३४९), 'पाखाल' (पू. २७) यांचा समावेश होतो. पाणी साठविण्यासाठी 'पासनासी' (उ.३४४, पोपटाच्या आकाराचे तोंड असलेली दगडी पन्हाळ) चा उपयोग करीत होते. घरांमधून 'अळंदीया' (पू.१६५) किंवा 'पाणवै'' (पू.५४९.पाणी साठविण्याची भांडी ठेवण्याकरिता एक विशिष्ट जागा.) होत्या.

तत्कालीन कालखंडात आंघोळ करण्यासाठी घरांमध्ये 'न्हाणी' (पू.५३४) होत्या. प्रतिष्ठितांच्या घरी स्नान घालण्यासाठी मळिवटे' (पू.७४) व 'मर्दनिया' (पू.१८) होते. त्या काळात स्नान करण्याच्या विविध पद्धती प्रचलित होत्या त्यात 'अभ्यंगस्नान' (पू.४६), 'अभ्रितस्नान' (पू. ५५१, यज्ञाच्या शेवटी यजमानाने करावयाचे स्नान), 'कपीलस्नान' (पू.११५) व 'कापडमादने' (पू. ११५, ओल्या वस्त्राने केवळ अंग पुसून केलेले स्नान), 'पांचपालवीं पंचामृते न्हवण' (पू. १७. पाच मंगल वृक्षांची पाने व पंचामृताने घातलेली आंघोळ), 'मात्रास्नान' (पू. २, विधीयुक्त मंत्रस्नान), 'मुसळबुडी' (उ. ३९६, पाण्यात मुसळ पडून ते एकदम वर यावे त्याप्रमाणे दिलेली बुचकळी), अशा विविध स्नानप्रकारांचा समावेश होतो.

मोठया घरांना 'चौकी' (पू. १७६, ओव-या असलेला मध्य भागातील चौकोनी उघडा भाग) होत्या. दारासमोर 'रायांगण' (पू.१९४, विस्तीर्ण मोकळे आंगण), 'पाड' (पू. ४०४), 'खण (पू.५०७) होते. घराच्या मागच्या बाजूला 'परूस' (पू. ८९, छोटेखानी अंगण) होते. घरांच्या बाजूला सांडपाणी वाहून नेण्याकरिता 'नासी' (पू, ५९, नाली), 'पन्हीवा' (उ.७९ मो-या) होत्या. या नाल्यांचे पाणी 'बोडी' त (उ.३०३, ड्याहारात) साठविल्या जात होते. घरांमध्ये 'पाखोळा' (उ.५१८, शौचस्थान) होत्या. गावातील 'थडी' (पू. ६६, नदी) काठी 'खळे' (पू. ४४७, स्मशान), 'समसान' (पू. १०) होते.

अशाप्रकारे एक आदर्श ग्रामसंकल्पना लीळाचरित्रकालीन काळात साकारल्या गेली होती. गावातील शासनव्यवस्था, समाजव्यवस्था ही आदर्शाप्रत पोहोचणारी होती. गावातील घरे, रस्ते, बाजार शाळा, जलाशय, गोठाण, शौच्चस्थाने, नाल्या, स्मशान याचेदेखील बारीकसारीक वर्णन लीळाचरित्रात आलेले आहे. गावातील व्यक्तीच्या गरजा गावातच भागविल्या जात होत्या. अन्नधान्यापासून ते पाण्यापर्यंत गावात सर्व उपलब्ध होते, त्यामुळे गावकऱ्यांचे जीवन स्वावलंबी बनले होते.

गावातील भांडणतंटयाचा निवाडा गावातच व्हावा, परस्परांतील वाद, हेवेदावे, मिटवून, शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून लिळाचरित्रकालीन ग्रामव्यवस्थेत वादविवादांचा निवाडा करण्यासाठी 'सभा' (पू.७२ पंचांची बैठक) बोलाविली जात होती. ही सभा 'संभावन शील' (उ.३८५,सर्व गावाला मान्य)असे. सभेच्या मुख्य 'सभ्य' (पू. ७१, मुख्य पंच)ही सभा बोलवीत होता. हे पंच 'विद्वांस' (पू.२६०,विद्वान), 'निबंधकार' (पू.२७, शास्त्र धारे न्याय करणारा) होते. काही गावांत श्रेष्ठ पुरुष देखील न्याय-निवाडा करीत, त्यांना 'माहाजन' (पू.१८१) म्हणत होते. लोक महाजनांजवळ जाऊन त्याला 'व्यवहार सांगत' (उ.२७७)गावातील 'वेवाद'(उ.५०९ , भांडण), 'उघाणी'( पू.७१, चर्चा )करून 'साक्ष' (पू.२७) तपासून सोडवीत.

लीळाचरित्रातील लोकजीवनात चुगलीपासून ते खुनासारखे मोठे गुन्हे करणा-या गुन्हेगारांचा वावर होता. यात एखाद्याची चुगली करण्यासाठी त्याला 'बोल'(पू.१०९, कलंक) लावीत.त्याचा 'बोभाटा'(पू.३३) करीत, गावभर 'भकत'(पू.६५,निंदा करणे), काही 'लटके'(उ.१९८, लबाड) किंवा 'लंड'(पू.५८७)नेहमी 'लटिका'(पू. ५१३, खोटा) व्यवहार करीत. एखाद्यावर 'विकल्प'(उ.१, संशय) घेण्यासही समाज मागेपुढे पाहत नव्हता. 'भांडणे'(उ.१६१), 'तूडपुड'(पू.४१६) देखील समाजात होत होती. 'वस्तूकारांचा' (उ.११,वाटसरू) 'नागोवा'(उ.५४५, लूट) करणारे,'वाट घेणारे' ही(उ.१७४) लुटारू होते. परराज्यातून लुटण्यासाठी काही लुटारू येत होते. त्यात गुजरातेतून येणारे लुटारू 'काबा'(पू.५) हे प्रमुख होते. 'ओरपेकार'(पू.३४३, दरोडेखोर) 'खाण'(पू.५५२, दरोडा), 'वड्या(पू.५७), 'ओरपा'(उ.५०३) घालीत होते. चोरांची काही 'खागे'(पू.११, संकेतस्थाने) होती. तिथे 'मोस'ची (पू.५४२,चोरीच्या मालाची) वाटणी होत होती.

याशिवाय 'बांदिकार'(उ.१४६, स्त्रियांना पळविणारे), 'प्रमादी'(उ.५९, धर्माविरुद्ध आचरण करणारे), 'परतारक'(उ.६२२, फसविणारा), 'पापर'(उ.९३, लत्ताप्रहार करणारे), 'त्रसविता'(उ.५९९, त्रास देणारे ),

‘घोणारूने‘(उ.१७७, जमिनीवर लोळवून ‘त्राहाटणे‘(पू.६० थापेणे मारणारे), ‘घाएखंडी‘(पू.९४,घाव घालणारे), ‘चाळवणे‘(पू.३२, लुटणारे),‘घनवरि‘(पू.५८९,घनाने प्रहार करणारे),‘चळणे‘(पू.१०९, भुलवून भ्रष्ट करणारे,) ‘व्यभिचारी‘(पू. व्यक्तीला वश करून लुटणारे), ‘घेणे‘(उ.४७६, ठार मारणारे), ‘घतने‘(उ.५९५,घात करणारे), ६००) इत्यादी प्रकारचे गुन्हेगार तत्कालीन लोकजीवनात होते.

चोर, लूट, दरोडे किंवा ठार मारणे या गुन्ह्यांना तत्कालीन न्यायव्यवस्थेत मोठा अपराध समजला जात होता. या अपराधाला कठोर शिक्षा होत्या. ब-याच वेळा ‘सिक्षापण‘(पू.२०६, समजाविणे) केले जात होते, तर कधी ‘प्राश्चित्त‘(उ.४४३) देऊन सुटका केली जात होती. कडक शिक्षांमध्ये ‘खैरी जुंपणे‘(उ.१७७, अपराध्याच्या पायाला दोर बांधून त्याला जुंपलेल्या खैरी बैलाकडून फरफटत नेणे.), ‘चुनखड्यात बसविणे‘(पू.२७, चुना भरलेल्या खड्यात अपराध्याला बसवून त्यात पाणी टाकणे.)‘तोंड शिवणे(उ.५२४), ‘खोडाबेडी घालणे‘(पू.५७, लाकडी ठोकळ्यावर पाय ठेवून लोखंडी पट्टीने आवळून ठेवणे ),‘खांडी गाव पुजणे‘(उ.१७४, शरीराचे मोहरी एवढे बारीक तुकडे करून त्याने गावच्या चारही वेशींचे पूजन करणे), ‘चौरंग करणे‘(पू.२०७,हातपाय तोडणे), ‘चौरंगी घाव घालणे‘(पू.२९९, विशिष्ट प्रकारे चहुबाजूंनी मारा करणे), ‘पिंपळी बांधणे‘(पू.४६७, चारचौघांसमोर चव्हाट्यावर शिक्षा करणे) इत्यादी शिक्षांचा समावेश होतो. छोट्या अपराधालाही शिक्षा ही ठरलेलीच होती.

यावरून यादवकालीन लोकजीवनात न्यायव्यवस्था ही किती दक्ष होती, हे दिसून येते. न्यायदेवतेनेपुढे लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा भेदभाव नव्हता. त्यामुळे अपराध करण्यास सहसा कोणी धजावत नव्हते, त्यामुळेच ग्रामव्यवस्थेला सुरक्षित व सुव्यवस्थित राखण्यासाठी न्यायव्यवस्था मदतगारच ठरत होती. उत्कृष्ट न्यायव्यवस्थेमुळे एका सुखी, संपन्न व स्वावलंबी गावाचे चित्रण लिळाचरित्रकालीन ग्रामव्यवस्थेत दिसून येते. आज आदर्श ग्राम संकल्पनेसाठी शासनाने जे निकष ठरविले आहेत, त्या सर्वांची बीजे लिळाचरित्र कालीन ग्राम व्यवस्थेत दिसून येतात.

संदर्भ -

(१)आत्रे त्रि. ना. : ‘गावगाडा‘ प्रकाशन वरदा बुक्स पुणे, आवृत्ती तिसरी, पुनर्मुद्रण १ जानेवारी १९९५, पृ. क्र.१

(२)काळदाते सुधा : ‘भारतीय समाजरचना’ भारत मुद्रक आणि प्रका. लि. औरंगाबाद, आवृत्ती पहिली, ऑगस्ट१९७६, पृ. क्र. २२०.

(३)वाघ विठ्ठल : ‘व-हाडी म्हणी आणि लोकधर्म’ लोक वाङ्मयगृह मुंबई, आवृत्ती पहिली, १ मे १९९७,पृ. क्र. ५५

(४) भागवत दुर्गा : ‘हिंदू धर्म आणि जातिसंस्था’, नवभारत, एप्रिल ६०

(५)आत्रे त्रि. ना. : ‘गावगाडा’ प्रकाशन वरदा बुक्स पुणे, आवृत्ती तिसरी, पुनर्मुद्रण १ जानेवारी १९९५, पृ. क्र. ९

(६)आत्रे त्रि.ना. : ‘गावगाडा’ प्रकाशन वरदा बुक्स पुणे, आवृत्ती तिसरी, पुनर्मुद्रण १ जानेवारी १९९५, पृ. क्र. ९,१०

आधारभूत ग्रंथ

कोलते वि.भी. संपादक- ‘लीळाचरित्र‘ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, ऑक्टोबर १९८२.

संदर्भ सुची

१) आत्रे त्रि.ना. ‘गावगाडा’
२) उपासे शिवशंकर व तडके जयसिंग ‘लिळाचरित्र दर्शन ’
३) काळदाते सुधा ‘भारतीय समाजरचना’
४) नागपूरे पुरुषोत्तम ‘लिळाचरित्र ’
५) नेने ह.ना. ‘लिळाचरित्र भाग चौथा’ खंड तिसरा,
६) वाघ विठ्ठल ‘व-हाडी म्हणी आणि लोकधर्म’